International Indexed & Refereed Research Journal, April- May, 2013 ISSN 0974-2832, RNI-RAJBIL, VOL-IV * ISSUE 51-52

शोध पत्र- समाजशास्त्र

# भारतातील स्त्रीभ्रूणहत्या ( सामाजिक - सांस्कृतिक संदर्भ )

* प्रा. डॉ. गजानन शं. वेले

April-May,2013

* सहयोगी प्राध्यापक, सामजशास्त्र विभाग, महिला कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूर, अमरावती

**प्राचिन भारतातील स्त्रीचे स्थान :**

**वैदिक कालखंड -**

वैदिक कालखंडात भारतीय समाजात स्त्रीयांना गौरवशाली स्थान प्राप्त होते. मुलींना मुलांप्रमाणे स्नेह आणि आदर प्राप्त होता. स्त्रीशिवाय कोणतेही धार्मिक कार्य होत नव्हते. त्या अध्ययन, अध्यापन, यज्ञ कार्य करीत होत्या, त्यांच्या -अधिकाराचा सन्मान केला जात होता. मुलींच्या जन्माबाबत तिरस्कार नव्हता, शूभकार्यात अविवाहीत मुलींची उपस्थिती अनीवार्य मानल्या जात होती. या कालखंडात बालविवाह, पर्दापथा अस्तीत्वात नव्हती, स्त्रीला आर्थिक, धार्मिक, राजनैतिक अधिकार होते. मुलींना शिक्षण देण्याची परंपरा होती. या काळात पती-पत्नीचा दर्जा समान होता. एकूण, वैदिक कालखंडात सामाजिक विकास प्रक्रियेत स्त्रीयांची भूमिका महत्वपूर्ण होती.

**रामायण काळात -** स्त्रीला नैतिकतेचा आदर्श मानण्यात आले. पतीसेवा व पतीच्या आज्ञेचे पालन करणे हाच तिचा धर्म होता.

**महाभारत कालखंडात -** स्त्रीचा प्रधान गुण चारित्र्य मानल्या जात होता. ती पूर्णत: स्वतंत्र नव्हती, तीच्यावर पुरुषांचे नियंत्रण होते. एकूण, या कालखंडात स्त्रीयांच्या पतिव्रत्य आणि सतीत्वार विशेष भर होता.

**मौर्यकालीन -** भारतीय समाजात स्त्रीयांची स्थिती सन्मानजनक नव्हती. याकाळात स्त्रीयांवर अनेक बंधने लादल्या गेली होती. स्त्रीशिक्षणाचा अभाव, पर्दाप्रथा, सतीप्रथा तसेच स्त्रीयांची विक्री होत, स्त्रीयांची हत्या व बहूविवाह प्रथा प्रचलित होती.

**गुप्तकालखंडात -** स्त्रीयांची स्थिती आणि तीच्या अधिकाराची जास्त हानी झाल्याचे आढळते, विधवा पुनर्विवाह करु शकत नव्हत्या.

**मध्ययुगीन काळात -** स्त्रीयांवर अनेक बंधने लादल्या गेली तीला पुरुषांच्या अधिन बनविले, धर्म,नीती, आणि सामाजिक मर्यादांची रचना पुरुषांनी केली आणि स्त्रीस्वातंत्र्याला ग्रहण लागले. या काळात अनेक आक्रमणांमुळे समाज असुरक्षित होता. शिक्षणव्यवस्था बिघडली, पर्दाप्रथेची सुरुवात होऊन शिक्षण आणि साहित्यापासून स्त्री दूर गेली. हा शिक्षणाचा अंधकार काळ समजल्या जातो. पुढील काळात पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीयांना पूर्णपणे बंदिस्त करुन टाकले. याच पुरुषप्रधान सत्तेतून स्त्रीहिंसाचाराचे नवीन पर्व सुरु झाले.

**स्त्रीहिंसाचार :-**

सद्यास्थितीत सर्वाधिक स्त्रीहिंसा व अत्याचार अफगनीस्थान व ईरान मध्ये इस्लामच्या नावावर होत आहे. त्यांनी स्त्रीविरोधी अत्यंत कठोर स्वरुपाचे कायदे केले आहे. ईरानमध्ये मुलींच्या विवाहाचे वय 9 वर्षे आहे. अमेरीकेसारख्या प्रगत आणि विकसित देशात 6 स्त्रीयांमधून एका महिलेला तीच्या पतीकडून नियमीत मारहान होते. पाकिस्थान मध्ये सुद्धा स्त्रीहिंसाचाराचे प्रमाण महत्तम आहे. दक्षिण आशिया, पश्चिम आशिया, चीन, आणि उत्तर आफ्रिकेमध्ये जवळपास 6 कोटी महिलांचा लैंगीक भेदाभावामुळे मृत्यू झाला आहे.

जागतिक स्तरावर 50% लैंगिक हल्ले (sexual assult ) 16 वर्षाखालील मुलींवर होतात. आशियातील स्टडीजनूसार जपान, मलेशिया, फिलीपाईन्स आणि दक्षिण कोरियात 30 ते 40% स्त्रीया लैंगिक हिंसेने पिडीत आहे. युनाइटेड स्टेट्स मध्ये पब्लिक स्कुल मधील 12-16 वर्षाखालील 83% मुली लैंगीक हिसाचाराने ग्रस्त आहे. (UN-WOMEN-2011) दक्षिण आशियामध्ये स्त्रिहिंसाचाराचे प्रमाण महत्तम आहे. त्यात भारताचाही समावेश होतो.

**भारतातील स्त्रीहिंसाचार :-**

भारतातील तामीळनाडू राज्यात बालिका शिशुहत्येचे प्रमाण जास्त आहे. मुलींना 'पिवळ्या कलेर' झाडाचे दूध पाजून त्यांची हत्या केली जाते, तर काहींना नाकतोंड दाबून मारल्या जाते. राजस्थानमध्ये मुलींचा जन्म झाल्याबरोबर हत्या करण्याची प्रथा आहे. मुलींना दुधाच्या टबामध्ये बुडवून किंवा अफिम देऊन मारल्या जाते. भारतात दरवर्षी जवळपास 5000 स्त्रीयांचा मृत्यु हुंड्याच्या कारणाने होतो. उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, बिहार स्त्रीहिंसाचारात पुढे आहे. एकुण भारतीय समाजात स्त्री हिंसाचाराची भिषण समस्या आहे. तसेच 16 वर्षाखालील मुलींवर होणारे लैंगिकहिंसेचे प्रमाण तसेच हुंड्याकरीता होणाऱ्या नववधूंच्या हत्येची संख्या वाढत आहे.

**भारतातील लिंगाधारित भेदभाव :-**

सद्यकाळात भारतीय समाजात लिंगाच्या आधारावर भेदभाव ही एक ज्वलंत समस्या आहे. प्राचीन काळात लिंगभेद नव्हता. पुढील काळात हळुहळु होणाऱ्या सांस्कृतीक पतनाने लिंगाधारावर भेदभाव करणे सुरू झाले. त्यामुळे समाजजीवनात पुरूषांना विशेष स्थान तर स्त्रीयांना गौणस्थान प्राप्त झाले. याकरीता समाजातील कुप्रथांचे महत्वपूर्ण योगदान असल्याने आढळले. भारतीय समाज हा पुरूषप्रधान आहे, त्यामुळे मुलींपेक्षा मुलांना अधिक महत्व दिल्या जाते. समाजात मुलाच्या जन्माचा आनंद होतो ; परंतु मुलींच्या जन्माचा तिरस्कार केल्या जातो. एकूण लिंगभेद हा समाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने संस्थागत असून हा भेद भारतीय समाजात सार्वत्रिक आहे. प्रत्येक समाजात ह्या लिंगभेदाचे दुष्परिणाम स्त्रीयांनाच भोगावे लागते, कारण सामाजिक स्तरीकरण प्रक्रीयेत स्त्रीयांना निम्न दर्जा दिला आहे, तसेच भारतीय समाजाने मुलींपेक्षा मुलांचे स्थान वरचे असल्याने मान्य केले आहे. आणि ह्या मान्यतेतच स्त्रीभ्रूणहत्येचा हा नवीन प्रकार दडलेला आहे.

**स्त्रीभ्रूणहत्या :-**

आज भारतीय समजात स्त्रीभ्रूणहत्येची संख्या धोक्याच्या पातळीवर पोहचली आहे. स्त्रीभ्रूणहत्येचा हा प्रकार केवळ मोठ्या शहरात नाही, तर लहान गावांमध्येसुध्दा आहे. भारतीय समाजातील सर्वच स्तरातील लोकांमध्ये स्त्रीभ्रूण हत्येविषयी मौन स्वीकृती आढळते. भारतीय समाजात मुलींची निरंतर घटत असलेली संख्या हा आज चिंतेचा विषय आहे. 1961 मध्ये 1000 मुलींच्या तुलनेत 976 मुली होत्या. 2001 मध्ये कमी होऊन 927 वर आल्या तर, 2011 च्या जनगणनेनूसार मुलींची संख्या पुन्हा कमी होवून 914 झाली. भारतातील राज्यनिहाय मुलींची संख्या पुढीलप्रमाणे.

**सारणी - 1 राज्यनिहाय मुलींची संख्या (0-6) (1000 मुलांच्या प्रमाणात)**

| अनु. क्रं. | राज्य / केंद्रशाशीत प्रदेश | 2001 | 2011 | वाढ / घट % |
|---|---|---|---|---|
| 1 | जम्मु आणि काश्मीर | 941 | 859 | -8.71 |
| 2 | हिमाचल प्रदेश | 896 | 906 | 1.12 |
| 3 | पंजाब | 798 | 846 | 6.02 |
| 4 | चंदिगड | 845 | 867 | 2.60 |
| 5 | उत्तराखंड | 908 | 886 | -2.42 |
| 6 | हरीयाणा | 819 | 830 | 1.34 |
| 7 | दिल्ली | 868 | 866 | -0.23 |
| 8 | राजस्थान | 909 | 883 | -2.86 |
| 9 | उत्तरप्रदेश | 916 | 899 | -1.86 |
| 10 | बिहार | 942 | 933 | -0.96 |
| 11 | सिक्कीम | 963 | 944 | -1.97 |
| 12 | अरूणाचल प्रदेश | 964 | 960 | -0.41 |
| 13 | नागालँड | 964 | 944 | -2.07 |
| 14 | मनिपूर | 957 | 934 | -2.40 |
| 15 | मिझोराम | 964 | 971 | 0.73 |
| 16 | त्रिपूरा | 966 | 953 | -1.35 |
| 17 | मेघालय | 973 | 970 | -0.31 |
| 18 | आसाम | 965 | 957 | -0.83 |
| 19 | पश्चिम बंगाल | 960 | 950 | -1.04 |
| 20 | झारखंड | 965 | 943 | -2.28 |
| 21 | ओरीसा | 953 | 934 | -1.99 |
| 22 | छत्तीसगड | 975 | 964 | -1.13 |
| 23 | मध्यप्रदेश | 932 | 912 | -2.15 |
| 24 | गुजरात | 883 | 886 | 0.34 |
| 25 | दमन आणि दिव | 926 | 909 | -1.84 |
| 26 | दादर आणि नगरहवेली | 979 | 924 | -5.62 |
| 27 | महाराष्ट्र | 913 | 883 | -3.29 |
| 28 | आंध्रप्रदेश | 961 | 943 | -1.87 |
| 29 | कर्नाटक | 946 | 943 | -0.32 |
| 30 | गोवा | 938 | 920 | -1.92 |
| 31 | लक्षव्दिप | 959 | 908 | -5.32 |
| 32 | केरळ | 960 | 959 | -0.10 |
| 33 | तामिळनाडू | 942 | 946 | 0.42 |
| 34 | पाँडेचेरी | 967 | 965 | -0.21 |
| 35 | अंदमान आणि निकोबार | 957 | 966 | 0.94 |
| | * भारत - | 927 | 914 | -1.40 |

(स्त्रोत - भारतीय जनगणना 2011)

वरील राज्यनिहाय मुलींची संख्या दर्शविणाऱ्या सारणीचा विचार केल्यास सर्वात जास्त घट जम्मू काश्मीर मध्ये दिसून येते. त्यानंतर दादर आणि नगरहवेली, लक्षव्दिप, महाराष्ट्र हा मुलींची संख्या कमी होणारे 4 थ्या क्रमांकाचे राज्य आहे. त्याखालोखाल राजस्थान, उत्तराखंड, मणीपूर, मध्यप्रदेश, नागालँड, ओरीसा, दमनदिव, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यात मुलींची संख्या घटलेली आहे. वरील सारणीनुसार 1901-1991 पर्यंत प्रत्येक दशकात भारतातील स्त्रियांची संख्या निरंतर कमी झालेली दिसते. मात्र 2001-2011 या दशकात 07 गुणांनी वाढलेली दिसते.

भारतीय समाजात सद्यस्थितीत स्त्रीगर्भाचे परिक्षण करून गर्भ हा मुलाचा की मुलीचा हे माहिती करून घेतल्या जाते. मुलींचा गर्भ असेल तर गर्भपात केल्या जातो. मानवतेच्या आणि कायद्याच्या दृष्टीने हा फार गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. भ्रूणपरिक्षण करणाऱ्या जास्तीत जास्त स्त्रीया ह्या शिक्षित व सधन वर्गातील असून दोन किंवा तीन मुली असणाऱ्या आहेत.

**सारणी - 2**

**भारतातील स्त्रीयांची घटती संख्या (2001-2011) (1000 पुरूषांच्या प्रमाणात)**

| वर्ष | स्त्रियांची संख्या |
|---|---|
| 1901 | 972 |
| 1911 | 964 |
| 1921 | 955 |
| 1931 | 950 |
| 1941 | 945 |
| 1951 | 946 |
| 1961 | 941 |
| 1971 | 930 |
| 1981 | 933 |
| 1991 | 927 |
| 2001 | 933 |
| 2011 | 940 |

**भ्रूणपरिक्षण म्हणजे काय ?**

**"**भ्रूणपरिक्षण हे असे परिक्षण आहे की, ज्याव्दारा गर्भस्थ शिशूच्या शारिरीक व मानसिक आरोग्याची माहिती मिळू शकते.**"**

**भ्रूणलिंग परिक्षणाची वेगवेगळी साधने पुढीलप्रमाणे -**

1) अल्ट्रासाउण्ड (अल्ट्रासोनोग्राफी)
2) एम्नियोसेन्टेसिस टेस्ट
3) प्रीइम्प्लॉन्टेशन स्टेज डायग्नोसिस
4) 3 डी इकोग्राम

**भ्रूणपरिक्षणाचा उद्देश**

भ्रूणपरिक्षणाचा मुख्य उद्देश गर्भस्थ शिशूचे आरोग्य, त्याचा विकास अथवा विकृती पाहण्याकरीता आहे, की ज्यामुळे डॉक्टर भ्रूणाच्या विकृतीचा छडा लावू शकेल. त्यामुळे गर्भस्थ शिशूची विद्रुपता आणि अपंगतेच्या समस्येपासून भ्रूण व पालक वाचू शकेल.

**भ्रूणपरिक्षणाचे काही महत्वाचे उद्देश पुढीलप्रमाणे -**

1) भ्रूणाची गर्भस्थ स्थिती माहिती करणे.
2) वंशानुगत दोष / किंवा विकृतीचा पता करणे.
3) हायड्रोसिफेल/डायड्रोथोरेक्स आजाराचा पता करणे.
4) जीनसंरचनेची माहिती घेणे.
5) जीनस्तरावर थॅलेसिरीया आजाराचा पता करणे, इत्यादी.

**स्त्रीभ्रूणहत्येची कारणे :-**

स्त्रीभ्रूणहत्येकरीता भारतीय समाजीतील केवळ निरक्षरता आणि गरीबी हे मुळ कारण नाही, तर स्त्रीयांप्रतिची आमची असंवेदनशिलता आहे, तसेच स्त्री ही स्वत:च हीनभावनेने ग्रस्त आहे. आजही महत्तम गर्भवती स्त्रीया ह्या पुत्रप्राप्तीची इच्छा ठेवतात. मुलाला जन्म देण्यात स्त्रीयांना

गर्व वाटतो. त्याचप्रमाणे आधुनिक काळात लहान कुटूंबाची धारणा बळावत आहे. प्रत्येकाला आपल्या कुटूंबात एक तरी मुलगा असणे आवश्यक वाटते. त्यामुळे पहिला जन्म मुलाचा झाल्यास दुसऱ्यावेळी गर्भलिंगपरिक्षण करून स्त्रीगर्भ असल्यास गर्भपाताचा निर्णय घेतला जातो.

**स्त्रीभ्रूणहत्येची काही सामाजिक कारणे पुढीलप्रमाणे -**

1) समाजातील स्त्रीयांची दुय्यम स्थिती.

2) हुंडाप्रथा

3) पुरूषप्रधान मानसिकता

4) स्त्रिहिंसाचाराचे वाढते प्रमाण.

**स्त्रीयांचा दुय्यम दर्जा :-**

भारतीय समाजातील स्त्रियांचा दुय्यम दर्जा स्त्रीभ्रूणहत्येचे महत्वाचे कारण आहे. स्त्रीला समाजजीवनात घृणा, तिरस्कार आणि अपमानीत होऊन जगावे लागते. कुटूंबातील आर्थिक व्यवहार पुरूषांकडेच असतो. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने ती पुरूषांवर निर्भर आहे. चूल आणि मूल एवढेच तीचे कार्यक्षेत्र समजले जाते. मुलींना - मुलाच्या तुलनेत आईचे दुध कमी दिल्या जाते. एकूण संगोपणातील भेदभाव, खानपान, शिक्षण, आरोग्याकडे दर्लक्ष इत्यादी बाबी स्त्रीयांच्या दुय्यम दर्जाला अधोरेखित करणाऱ्या आहे.

**हुंडाप्रथा :-**

हुंड्याच्या कुप्रथेमुळे समाजात मुलींचा जन्म हा मातापित्यांना नकोसा वाटतो. मुलीचा जन्म एक अभिशाप समजल्या जातो. कारण मुलींच्या जन्मापासूनच मातापित्यांना हुंड्याची चिंता सतावत असते. विवाह समारंभात वधूपित्यांला प्रचंड खर्च करावा लागतो, त्यामुळे हुंडा आणि विवाहखर्चाकरीता धन किंवा पैसा जूळविणे हे गरीब मातापित्यांसाठी एक दिव्यच असते. त्याला जास्ती व्याजदाराने कर्ज काढावे लागते, कर्जबाजारी होवून मुलींचे विवाह करण्याचे प्रमाण ग्रामीण समाजात जास्त आहे. ही बाब अलिकडील काळात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येस पूरक ठरलेली दिसते. एकुण वरील सर्व झंझाटातून मुक्ती किंवा सुटका मिळविण्याच्या मानसिकतेतूनच स्त्रीभ्रूणहत्या वाढलेल्या आहे. समाजातील स्त्रीयांचे प्रमाण कमी होण्याचे हुंडाप्रथा एक महत्वाचे कारण आहे.

**पुरूषप्रधान मानसिकता:-**

समाज, धर्म, राजनीती, अर्थव्यवस्था या सर्व पैलूंची संरचना पूरूषांच्या हितसंबंधाच्या आणि महत्वाकांक्षेच्या अनूरूप विकसित झाली. या विकासप्रक्रीयेत पूरूषांना उच्च स्थान तर स्त्रीयांना गौण समजले गेले. त्यामुळे समाजात पूत्रलालसा किंवा लोभ वाढला.

मुलाला वंशाचा दिवा, वृध्दावस्थेचा आधार मानल्या गेले, तर मुलींना परक्याचे धन समजल्या गेले. पूर्वजांना श्रध्दांजली, मृत्यूसंस्काराचा अधिकार मुलांनाच आहे. एकुण प्रचलित सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक धारणा तसेच स्त्रीविरोधी मानसिकतेतूनच स्त्रीभ्रूणहत्येला चालना मिळाली आहे.

**स्त्रीहिंसाचाराचे वाढते प्रमाण:-**

भारतीय समाजात स्त्रीहिंसाचार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात सर्वत्र पाहायला मिळते. स्त्रीयांविरूध्दच्या प्रत्यक्ष हिंसारात बलात्कार, हुंडाबळी, शारिरीक यातना, लिंगशोषण, भावणात्मक शोषण इत्यांदीचा समावेश होतो, तर मुलींच्या पालन-पोषणातील भेदभाव, स्त्रीयांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे, इत्यादीतून होणारे स्त्रीयांचे मृत्यु अप्रत्यक्ष स्त्रीहत्येचीच रूपे आहेत. ह्या सर्व स्त्रीहिंसाचारानेच स्त्रीभ्रूणहत्येला प्रभावित केले आहे.

**स्त्रीभ्रूणहत्येचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम :-**

स्त्रीभ्रूण हत्येकरीता केवळ स्त्रीयांनाच दोष देवून चालणार नाही, तर या समस्येकरीता पूर्ण समाज दोषी आहे. या समस्येला नियंत्रित केले नाही तर, त्याचे फार मोठे वाईट परिणाम पूढे भोगावे लागतील. स्त्रीभ्रूणहत्येमुळे दरवर्षी भारतीय समाजातील स्त्रीयांची संख्या घटत आहे, यातून सामाजिक असंतुलन निर्माण होवून समाजव्यवस्थेत अराजकता वाढेल.

**स्त्रीभ्रूणहत्येतून निर्माण होणारे संभावित परिणाम पुढीलप्रमाणे :-**

1) प्रौढ अविवाहित मुलांची संख्या वाढेल.

2) एकविवाह पध्दती (आदर्श विवाह) प्रभावित होऊन घटस्फोटाचे प्रमाणपत्र वाढेल.

3) वेशावृत्तीला चालना मिळतील.

4) समलैंगीक संबंधाला प्रोत्साहन मिळतील.

5) एड्ससारख्या महाभयंकर आजारात वाढ होईल.

6) वधूमूल्य देण्याची प्रथा अस्तित्वात येत आहे.

7) आंतर विवाहाला प्रोत्साहन मिळत आहे.

8) परप्रांतातून मुलींना फुस लावून बळजबरीने विवाह करण्याचे प्रकार घडत आहे.

9) विवाह संबंधात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

**स्त्रीभ्रूणहत्येला नियंत्रित करण्यासाची उपाय :-**

स्त्रीभ्रूण हत्येसंबंधी व भ्रूणलिंग परिक्षण केद्राच्या विरोधी 1 जानेवारी 1966 ला लोकसभेत एक महत्वपूर्ण विधेयक पारित झाले होते, परंतू ते असफल राहीले. त्यानंतर भारत सरकारने 1994 च्या द प्री कंसेप्शन एण्ड प्रीनेटल डायग्नोस्टिक टेक्निक्स (प्रोव्हिबेशन ऑफ सेक्स सिलेक्शन - PCPNDT) ॲक्टनुसार गर्भातील लिंगाची माहिती देणे हा गुन्हा आहे. गर्भलिंगाची माहिती देणाऱ्याला 50000 रू. दंड व 5 वर्षाची कैद, हिच शिक्षा गर्भलिंग माहिती करून घेणाऱ्या पतीपत्नीला सुध्दा आहे. त्याचप्रमाणे गर्भलिंग तपासणी करणाऱ्या डॉक्टरची डिग्री रद्द करण्याचेही प्रावधान आहे. या कायद्याची कठोर आणि प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली तरच अल्ट्रासाऊण्ड क्लिनिकमधे होणारे लिंगपरिक्षण बंद होईल.

स्त्रीभ्रूणविरोधी कायद्याबरोबरच स्त्रीशिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, तसेच ग्रामिण व शहरी समाजातील मुलींचे शाळा सोडण्याचे (Dropout) प्रमाण कमी करणे, त्यांना रोजगाराच्या नवनव्या संधी उपलब्ध करून आर्थिक स्थिती मजबूत करणे. केवळ शिक्षण हाच घटक मुलींच्या पुढील विकासाकरीता पर्याप्त नाही, तर गरज आहे, ती मुलींच्या आरोग्य, आणि पोषणाची त्यांना सकस आहार देण्याची. त्याचप्रमाणे पुरूषप्रधान मानसिकता बदलविण्याची आवश्यकता आहे. स्त्रीभ्रूणहत्येच्या नियंत्रणाकरीता सामाजिक आंदोलनाची तिव्रता वाढवून मुला-मुलींच्या समानतेचा प्रचार करणे, तसेच लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत लोकसंख्या घटवा, मुली वाचवा अभियान चालविण्याची गरज आहे.

महात्मा गांधीजीच्या समाजिक चिंतनात व्यवस्थेतील बदलापेक्षा

सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने श्रेष्ठ-कनिष्ठता, हिनतेची भावना, लैंगीक असमानता आणि सामाजिक दास्यतेच्या प्रवृत्तीला बदलविण्याचा आग्रह आहे. त्यांच्या मते - लहानपणीच समानतेच्या संस्काराला प्रारंभ केला पाहिजे, तेंव्हाच पूढे स्त्री-पुरूषांमध्ये एकरूपता निर्माण होईल. स्त्रीभ्रूणहत्येला आळा घालण्यासाठी सामाजिक चेतना निर्माण करून पुरूषांनी स्त्रियांप्रती आपल्या कर्तव्याला व जबाबदारीला समजले पाहिजे. त्यांच्या सर्वांगीन विकासाकरीता संरचनात्मक व संस्थागत परिवर्तनाची कास धारली पाहीजे.

भारत सरकार स्त्रीयांच्या कल्याणाकरीता अनेक योजना व कार्यक्रम राबवित आहे. उदा. माताशिशू स्वास्थ कार्यक्रम (1992), किशोरी बालीका योजना (1992), महिला समृध्दी योजना (1993), स्वयंसहाय्यता गट योजना (1993), स्वास्थ सखी योजना (1997), महिला स्वशक्ती योजना (1998), स्त्रीशक्ती पुरस्कार योजना (2000), कामधेनू योजना इत्यादी परंतू या योजना विशेष परिणामकारक ठरलेल्या नाही. तेंव्हा या योजना व कार्यक्रमांचे वैज्ञानिकदृष्टीने मुल्यांकन करून त्यातील उणीवा दुर करण्याची आवश्यकता आहे. तेंव्हा आपोआपच स्त्रीभ्रूणहत्येला आळा बसू शकेल.

**सारांश आणि निष्कर्ष :-**

भारतीय समाज जिवनात पारंपारीक नितीमुल्ये, सामाजिक प्रमाणके तसेच कुटूंब आणि विवाहसंस्थांचा खोलवर प्रभाव पडलेला दिसतो. त्यासाठी पितृसत्ताक मुल्ये त्यागण्याची व नवीन मुल्याची रूजवन करण्याची आवश्यकता आहे. सर्व स्तरांमध्ये स्त्रीयांचा अधिकार स्थापीत करूनच लींगविषयक चाकोरीबध्द कल्पनेला आपण नष्ट करून शकू.

तसेच मुली आणि स्त्रीयांच्या सांस्कृतिक भूमीकाही बदलतीत. स्त्रीयांमध्ये स्त्रीभ्रूण हत्येबाबत जागृती घडवून, आणि पुनःसामाजिकरण (Resocialication) करून आपण लिंगविषमतेला नष्ट करू शकतो.

सद्यस्थितीत भारतीय समाजातील लिंगविषयक भुमिकेला नव्याने परिभाषित (Re-define the sex role) करण्याची गरज आहे. जेंव्हा लिंगविषयक भूमीकेच्या संवेदनेला समजण्याची पध्दत समाजात रूजलेली, तेंव्हा आपोआपच मुली आणि स्त्रीयांचा समाजातील दर्जा बदलतील. तसेच त्यांच्या विकासाच्या मर्यादा संपूष्ठात येईल. त्याच बरोबर शाळेत जाणाऱ्या मुलींच्या आरोग्य आणि पोषणाची त्यांना सकस आहार देणाऱ्या योजनांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करून; सर्व योजनांचे वैज्ञानिक दृष्टीने मुल्यांकन झाले पाहिजे. तेंव्हाच स्त्रीभ्रूण हत्येच्या समस्येचे निर्मुलन होईल.

## संदर्भ ग्रंथ


1 Bhadra, Mita - 1999“Girl Child in Indian Society”, Page No. 71,89 “Rawat Publications, Jaipur.

2 भारव्दाज, निधी - 2012“महिला सशक्तीकरण” पृ. क्रं. 25 51 “सागर पब्लीशर्स,” जयपूर

3 चतुर्वेदी, प्रतिमा - 2012“भारत मे महिला साक्षरता और सशक्तिकरण”पृ. क्रं. 201, 233 ‘वाई किंग बुक्स’,जयपूर

4 Ganihar, Noorjehan - 2007“Gender Issues and Women Empowerment”,Page No. 23, 24 Discovery Publivhing House, New Delhi.

5 जैन, प्रतिभा (संपा) 1998“भारतीय स्त्री (सांस्कृतिक संदर्भ)” पृ. क्रं. 254, 256‘रावत पब्लिकेशन’, नई दिल्ली.

6 Klhari, M. S. - 2011

7 “Women and our Panchayati Raj System”, Page no. 109, 111, Neha Publication and Distributors, New Delhi.

8 गुप्ता, मंजु - 2009 “भ्रूण-हत्या और महिलायें पृ. क्रं. 6, 11, 55 ‘अर्जुन पब्लिशिंग हाऊस’, नई दिल्ली.

9 मिश्रा, राजन - 2006“नातेदारी, विवाह और परिवार” पृ.क्रं. 134, 135

10 ‘एस, आर. साईन्टिफिक पब्लिकेशन’, आगरा.